दै. प्रजावाणी दि. 06-10-24

# दरोड्यातील चार गुन्हेगारांकडून सव्वातीन लाखाचा मुद्देमाल जप्त

## अल्पवयीन मुलांचा समावेश; दोन आरोपी फरार

**प्रतिनिधी • नांदेड**




खंजरचा धाक दाखवून दरोडा घालणाऱ्या चार जणांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या असून त्यांच्या ताब्यातील सव्वा तीन लाख रुपयांचा मुद्देमाल विमानतळ पोलिसांनी जप्त केला आहे. चार आरोपी पैकी दोघे जण विधी संघर्षीत बालक आहेत. या गुन्ह्यातील आणखी दोघे जण फरार आहेत.

खंजरचा धाक दाखवून दरोडा घालणारे आरोपी हे पाकीजानगर, देगलूर नाका तसेच खुदबेनगर भागातील असल्याची माहिती विमातळ पोलिसांना प्राप्त झाली. आरोपीमध्ये शेख इलियास शेख इरफान, मोहम्मद फेरोज मोहम्मद हमीद, शेख शाहेद यांच्यासह तीन विधी संघर्षग्रस्त बालकांचा समावेश असल्याचे समजल्यानंतर पोलिसांनी शेख इलियास व मोहम्मद फेरोज यांच्यासह दोन विधीसंघर्ष बालकांना ताब्यात घेतले. त्यांची विचारपूस केली असता गुन्ह्याची कबुली दिली. गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी, दहा वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल, असा एकुण ३ लाख २७ हजार रुपयाची मुद्देमाल व खंजर पोलिसांनी जप्त केले. या गुन्ह्यातील दोन आरोपी फरार असून पोलीस शोध घेत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, आ. पो. अ. सुरज गुरव, डिवायएसपी किरतीका सी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. गणेश चव्हाण, पोउपनि विनोद साने, कर्मचारी दारासिंग राठोड, शेख जावेद, शेख शोएब, राजेश माने, हरप्रितसिंघ सुखई, नागनाथ स्वामी आदींनी केली.